# पाषाणमधील अनधिकृत दुकानांवर अतिक्रमण कारवाई; एक लाख चौरस फुटांचे बांधकाम पाडले

**पुणे** : पाषाणमध्ये पुणे-मुंबई महामार्गावर सातत्याने होणारी वाहतूक कोंडी, अपघात टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने अनधिकृत दुकाने, शो रूम, फर्निचर मॉलवर कारवाई केली. महापालिकेने एक लाख चौरस फुटांचे बांधकाम पाडले.

पाषाणमध्ये महामार्गालगत संरक्षण विभागाची उच्च ऊर्जाधारक पदार्थ संशोधन प्रयोगशाळा (एचईएमआरएल) ही संस्था आहे. या संस्थेच्या प्रतिबंधित क्षेत्रात बांधकाम करण्यास मनाई आहे. असे असतानाही संबंधित प्रतिबंधित क्षेत्रामध्ये मागील काही वर्षांपासून शो रूम, फर्निचर मॉल उभारण्यात आले होते. तेथे वर्दळ वाढल्याने महामार्गावर वाहतूक कोंडी, तसेच अपघाताचे प्रकार घडत होते. यासंदर्भात 'एचईएमआरएल'च्यावतीने महापालिका प्रशासनाला संबंधित ठिकाणी कारवाई करण्याबाबतचे पत्र पाठविण्यात आले होते.

महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाने संबंधित तक्रारीची दखल घेऊन गुरुवारी पाषाण परिसरातील महामार्गालगतच्या अनधिकृत शोरूम, फर्निचर मॉल यांच्यावर कारवाई करून एक लाख चौरस फुटाचे बांधकाम पाडले. आगामी आठवड्यातही याच पद्धतीने महामार्गावरील अन्य अनधिकृत मॉल, शो रूम, स्टॉल्स, दुकाने काढण्यात येणार आहेत. महापालिकेचे अधीक्षक अभियंता युवराज देशमुख, कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता सुनील कदम, राहुल रसाळे यांच्या पथकासह १५ बिगाऱ्यांनी ही कारवाई केली. हिंजवडी पोलिसांच्या बंदोबस्तात ही कारवाई पूर्ण करण्यात आली.

# पुण्यात सुपरस्टार सर्कसला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे** : पुणे शहराजवळ सुरू असलेल्या विशाल, उत्कृष्ट आणि भव्य मनोरंजक सुपरस्टार सर्कसला परिसरातील प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सर्कसमधील अनेक आकर्षक कसरतींमुळे दररोज तीन खेळ हाऊसफुल सुरू असल्याची माहिती सर्कसचे मालक महादेव माने यांनी दिली.

सध्या सर्कसला घरघर लागली आहे. लोकप्रतिनिधींनी, समाजाने सर्कस वाचवण्याकरिता काम केले पाहिजे, असे माने म्हणाले. सर्कसमधील कलाकारांना काही काम नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. एम.एम. स्कूलजवळ, थेरगाव, डी मार्ट, काळेवाडी रोड, पिंपरी-चिंचवड (पुणे) येथे सर्कस सुरू झाली असून त्याला पुणेकर चांगला प्रतिसाद देत आहेत. संपूर्ण भारतात एकमात्र महाराष्ट्रीयन सर्कस असलेल्या सुपरस्टार सर्कसमध्ये महिला कलाकार ९० आहेत. त्यामध्ये कलाकारांचे काम उल्लेखनीय आहे. यामध्ये प्लास्टिक बॉलनेस, ग्रुप डान्स, मोटारसायकल बाईक, एकचाकी सायकल, बॉलनेस गर्ल्स, रिंग डान्स, पॉकेट सायकल, बुट्टा जोकर यासह अनेक खेळ आहेत. ही सर्कस एक महिना काळेवाडीवर सुरू राहणार असून तिकीट दर सर्वसामान्यांना परवडणारे आहेत. दररोज तीन खेळ होणार आहेत. यामध्ये प्रत्येक शो हा दोन तासांचा असणार आहे. सर्कसच्या जगतातील सर्वात लहान जोकर बुट्टा जोकर सुपरस्टार सर्कसचा हीरो आहे. लहान मुलांचा उत्साह वाढवत आहे. जोकर हा एकचाकी सायकल चालवून सर्वांची मने जिंकत आहे. सलग सुट्टीचा काळ असल्याने ॲडव्हान्स बुकिंग सुरू आहे.

महाराष्ट्रात फक्त तीन सर्कस सुरू आहेत. सर्कशीचा डोलारा सांभाळणे तारेवरची कसरत आहे. यामध्ये कलावंतांची उपेक्षा होत आहे. कोरोना कालावधीत तर येथील कलाकारांवर अत्यंत बिकट परिस्थिती ओढावली होती. अखेरची घटका मोजणारी सर्कस टिकली पाहिजे, याकरिता शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा भविष्यात लहान मुलांसह कोणालाच सर्कस पाहावयास मिळणार नाही, असे मत सुपरस्टार सर्कसचे संचालक आणि जत तालुक्यातील माडग्याळचे सुपुत्र प्रकाश माने यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. प्रकाश माने म्हणाले, श्वास रोखून धरायला लावणाऱ्या कसरती व विदूषकाचा करामती हे सर्कशीतील आकर्षण आहे. प्राणी आणि लहान मुले यांना सर्कसमध्ये बंदी घातली आहे. अशा प्रतिकूल स्थितीतही कलावंतांच्या कसरतींवर मदार ठेवून सर्कशीचा तंबू कायम ठेवण्यात आम्ही आतापर्यंत यश मिळवले आहे. कोणत्याही ठिकाणी येताना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

खेळांचा परवाना, विद्युत कनेक्शन, आरोग्य विभाग, पोलीस परवाना, जाहिरात परवाना, ध्वनिक्षेपक आदी परवाने मिळवताना प्रशासनाचे उंबरे झिजवण्याची वेळ आमच्यावर येते. प्रसंगी व्याजाने पैसे घेऊन डोलारा उभारावा लागत असल्याचेही माने यांनी सांगितले.

### आ. गाडगीळांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

सर्कसच्या अडचणीसंदर्भात आ. सुधीर गाडगीळ यांच्याशी चर्चा झाल्यानंतर आ. गाडगीळ यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे मागण्या सोडवण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने शासकीय अनुदान मंजूर व्हावे, स्थानिक विकास निधीत सर्कसकरिता तरतूद करावी, सर्व परवाने जादा रकमेची मागणी न करता मिळावेत, कलाकारांना विमा संरक्षण मिळावे, सर्कस मालक, संचालक, कामगार यांना माणसाप्रमाणे वागणूक मिळावी, या मागण्यांचा पत्रात समावेश आहे.

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री. केतन गुलाब गावडे आणि त्यांचे वडील श्री. गुलाब सखाराम गावडे, रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे यांनी दोघांनी मिळून मौजे मंचर येथील बिगरशेती जमीन स. नं. १३०/२ पैकी क्षेत्रावर बांधकाम केलेल्या स्वामी समर्थ इमारतीमधील तळ मजल्यावरील २ गाळे आणि पहिल्या मजल्यावरील हॉल अशी मिळकत रजिस्टर्ड खरेदीखत दस्त क्रमांक १०४८/२०१६ दिनांक ११/०३/२०१६ नुसार खरेदी घेतली असून सदरचा मूळ खरेदीखत दस्त क्रमांक १०४८/२०१६ त्याची सूची क्रमांक २ आणि खरेदीखताची मूळ पावती व इतर कागदपत्रे असलेली संपूर्ण फाईल श्री. केतन गुलाब गावडे यांचेकडून दिनांक २५/११/२०२३ रोजी सा. ६.०० वाजताच्या सुमारास प्रवासात गहाळ झाली आहे. सदर कागदपत्राची फाईल गहाळ झाल्याची रितसर तक्रार मंचर पोलीस स्टेशनला गहाळ वस्तू रजिस्टर्ड क्रमांक ५०८/२०२३ अन्वये दिनांक २७/११/२०२३ रोजी दाखल केली आहे.

तरी सदर कागदपत्राची फाईल अथवा त्यातील कागदपत्र कोणासही मिळाल्यास किंवा आढळून आल्यास ती खालील पत्त्यावर आणून द्यावी.

येणेप्रमाणे नोटीस दिली असे..

मंचर, दि. ३०/११/२०२३

**श्री. केतन गुलाब गावडे करीता**
**स्वाक्षरित/-**
**ॲड. व्ही. एन. चासकर,**
**मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.**
**मो. ९०९६०६९१८०/९७६३९२७५२७**

---

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

### अहमदनगर शहर येथे माझी वसुंधरा २.० अभियान राबविणे-२०२२-२३

### ई निविदा सूचना क्रमांक -302/सन 2023-24

**अहमदनगर शहर येथे माझी वसुंधरा २.० अभियान राबविणे अंतर्गत ०१** कामाची ई-निविदा सुचना क्र ३०२/सन २०२३-२४ ई-टेंडर पद्धतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त, यांचे मान्यतेने)

स्वाक्षरी/-
**शहर अभियंता**
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

सां.बां.विभाग / जावक क्र. ३४४३
दिनांक ३०/११/२०२३
अहमदनगर म.न.पा.

---

## ग्रामपंचायत पिंपळे खालसा, ता. शिरूर, जि. पुणे

### निविदा नोटीस क्र. २ सन २०२३-२४

**ग्रामपंचायत पिंपळे खालसा ता. शिरूर, जि. पुणे** खालील कामांचे सीलबंद निविदा / दरपत्रके जि.प.पुणे कडील नोंदणीकृत सु.बे. अभियंता ठेकेदाराकडून / पुरवठा दाराकडून २ पाकीट पद्धतीने मागवीत आहे. कोऱ्या निविदाचा नमुना ग्रा.पं. पिंपळे खालसा कार्यालयात. ०१-१२-२०२३ पासून ०७-१२-२०२३ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत देण्यात येईल. तसेच भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. ०१-१२-२०२३ पासून ०७-१२-२०२३ पर्यंत सायंकाळी ४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय पिंपळे खालसा येथे स्वीकारल्या जातील. व ०८-१२-२०२३ रोजी सकाळी ११ वा. उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी रक्कम | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे खालसा अंतर्गत पाणी पुरवठा लाईन करणे. | ३७२१६१ | २००/- | ३७२२/- | ६ महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे-** १- कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रा.पं. कार्यालयात भरून निविदा अर्ज उपलब्ध करून घ्यावेत. २- कोणतीही निविदा / दरपत्रक रद्द करणेचा, स्विकारनेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत पिंपळे खालसा यांनी राखून ठेवला आहे. ३ - सदर कामाच्या अटी व शर्तीचा संपूर्ण तपशील निविदा संचामध्ये नमूद केला आहे. ४ -बयाना रक्कम कोणत्याही बँकेतील धनादेशाद्वारे ग्रा. पं. पिंपळे खालसा यांच्या नावे काढून तो लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत पिंपळे खालसा, ता. शिरूर, जि. पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पिंपळे खालसा, ता. शिरूर, जि. पुणे**

---

## शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई

**प्रशासकीय कार्यालय :- शिवकृपा भवन, प्लॉट नं. आर २२५,**
**टि.टि.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम. आय. डी. सी. रबाळे, नवी मुंबई, ४००७०१.**
**☎ ०२२-६९२२११११ वेबसाईट : www.shivkrupapatpedhi.com**

### जाहीर निविदा

संस्थेच्या पुणे ०२ विभागीय कार्यालय, आळंदी, राजगुरूनगर व कवठेमहांकाळ या शाखा कार्यालयाच्या अंतर्गत सजावटीचे ( फर्निचर, फेब्रिकेशन, रंगकाम, इलेक्ट्रीक, पी. ओ. पी. इ.) काम करणेकरीता सक्षम पुरवठादार / ठेकेदार यांचेकडून मोहरबंद निविदा / प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. याबाबतचे निविदा फॉर्म फी भरणा करून दि.०७/१२/२०२३ पर्यंत संस्थेच्या उपरोक्त पत्त्यावर मिळतील. निविदा फॉर्म दि.१४/१२/२०२३ रोजी दु. ३.०० वा. पर्यंत संस्थेच्या उपरोक्त पत्त्यावर स्विकारण्यात येतील.

**टिप :- कोणतीही निविदा / कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.**

**दिनांक :- ०१/१२/२०२३** **- मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **सौ. वर्षा अशोक रेणुसे** असून, सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्यासंदर्भात आमचे अशिल व सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचे दरम्यान बोलणी होवून, सदर मिळकत संपुर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे अशी खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिली आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही व्यक्ती वा संस्थेचा कोणताही हक्क व अधिकार, हितसंबंध असल्यास अशा व्यक्ती वा संस्थांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आंत हरकत नोंदवावी अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली, मे. सब रजिस्ट्रार हवेली यांचे हद्दीतील तसेच पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील केशवनगर ग्रामपंचायत तालुका- हवेली/ पुणे शहर, जिल्हा- पुणे येथील जमीन स.नं. २९/१अ / २, यांसी क्षेत्र ०० हे. ६६आर पैकी पार्ट नं. ६६अ एकूण क्षेत्रफळ १६३५ चौ. फुट (१९१.९५चौ.मी.) यांसी चतुःसिमा- **पूर्वेस** - श्री. खान यांची मिळकत, **दक्षिणेस**- पार्ट नं.६६ब, **पश्चिमेस** - रस्ता, **उत्तरेस** - श्री. बहुले यांची मिळकत, या मिळकतीवर बांधण्यात आलेले तळ मजला + तीन मजल्यांचे आर.सी.सी. बांधकाम एकूण क्षेत्रफळ ३७९७ चौ.फुट यांसी केशवनगर ग्रामपंचायत दप्तरी मिळकत क्र. ६३१.

सही/-
पुणे दि. ३०/११/२०२३
**Adv. Yashvant B. Gaikwad**
Office : S. No. 70, Memane Bldg. Old Tofkhana, Shivajinagar, Pune-411005
M-No.9067159247

---

# शुल्क थकविणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांवर कारवाई करणार

## पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांनी स्वायत्त दर्जा प्राप्त केल्यानंतर महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात नमूद केलेल्या तरतुदीनुसार विद्यापीठाला निश्चित केलेले शुल्क देणे बंधनकारक आहे. परंतु, या स्वायत्त महाविद्यालयांनी कोट्यवधी रुपयांचे शुल्क थकवले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे या महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

पुणे विद्यापीठाशी संलग्न शहरातील बहुतांश नामांकित महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. त्यामुळे या महाविद्यालयांच्या परीक्षा या महाविद्यालय स्तरावर घेतल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांचे निकालही महाविद्यालयातर्फेच जाहीर केले जातात. मात्र, महाविद्यालये स्वायत्त झाली तरीही विद्यार्थ्यांचा डेटा विद्यापीठाकडे ठेवावा लागतो. विद्यार्थ्यांच्या पदवीवर विद्यापीठाच लोगो असतो. त्यामुळे नियमानुसार महाविद्यालयांनी विद्यापीठाला शुल्क देणे अपेक्षित आहेत.

काही महाविद्यालयांनी गेल्या दहा वर्षांपासूनचे विविध प्रकारचे शुल्क जमा केले नसल्याचे दिसून येत आहे. तर काही महाविद्यालयांनी नियमानुसार शुल्क विद्यापीठाकडे जमा केले आहे. मात्र, दिवसेंदिवस स्वायत्त महाविद्यालयांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे त्यांच्याकडे असणाऱ्या थकीत शुल्काचा आकडा काही कोटींच्या घरात जात आहे. त्यामुळेच विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयाला पत्र पाठवून शुल्क भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

---

# पुणे महानगरपालिका

## निविदा प्रक्रिया कक्ष

## निविदा जाहिरात-नविन कामे

विक्री कालावधी दिनांक :- ०१/१२/२०२३ ते ११/१२/२०२३ वेळ : दु. ०२.०० पर्यंत
स्वीकृती कालावधी दिनांक :- ०१/१२/२०२३ ते ११/१२/२०२३ वेळ : दु. ०२.०० पर्यंत

जाहिरात क्र. : ४६-DC-५-२०२३ दिनांक : ३०/११/२०२३
टेंडर उघडणे दिनांक : १३/१२/२०२३ दु. १२.०० वाजता.

| अ. क्र. | टेंडर क्र. | विभाग | कामाचे नाव | निविदा संच किंमत | टेंडर रक्कम | १% बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/152 | विद्युत | गिरीधर भवन ते पूनावाला गार्डन येथे डेकोरेटिव्ह पोलचे देखभाल दुरुस्ती करणे. | ४१५ | ४२३३५१ | ४२३४ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| २ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/153 | विद्युत | खडकेवस्ती, शिवतेजनगर, पद्मावतीनगर, गणेशनगर येथे विद्युत विषयक सुधारणा करणे. | ४१५ | ८४७३७८ | ८४७४ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| ३ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/154 | विद्युत | पुणे म.न.पा.च्या गुलटेकडी येथे व्हेईकल डेपोच्या कंट्रोल पॅनेल व वायरिंगचे काम करणे. | ४१५ | ८४७०५३ | ८४७१ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| ४ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/155 | विद्युत | के. के. मार्केट परिसर व भगली हॉस्पिटल परिसरात विविध विद्युत विषयक कामे करणे. | ४१५ | ८४६७६० | ८४६८ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| ५ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/156 | विद्युत | पंडित दिनदयाळ उपाध्याय शाळा, ओसवाल दवाखाना येथे विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ४१५ | ८२८८४० | ८२८८ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| ६ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/157 | पथ | लुल्लानगर येथे विनर्स कोर्ट येथील फुटपाथ विकसित करणे. (जुना प्रभाग क्र. २८) (फेरनिविदा) | ४१५ | ४२३६६१ | ४२३७ | ९ महिने | संपदा काळे ८२७५४५८९८८ |
| ७ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/158 | ड्रेनेज | महापालिका सहाय्यक आयुक्त बिबवेवाडी कार्यालय अंतर्गत जुन्या ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्ती करणे, ड्रेनेज लाईन व चेंबर साफसफाई करणे (भाग-२) | ४१५ | २६८८०३ | २६८८ | ५ महिने | अतुल धोत्रे ९५९४०४४००७ |
| ८ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/159 | भवन | मूळ कामाचे नाव :- बिबवेवाडी ओटयालगत डांबरीकरण करणे - जागा बदल केल्यानंतरचे नाव :- प्रभाग क्र. ३६ (जुना) मधील आईमाता मंदिराजवळच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ४१५ | ८४३८३२ | ८४३८ | ५ महिने | नुतन सिनारे ९९२१९२४५४२ |
| ९ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/160 | भवन | बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य कोठया दुरुस्त करणे व अनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ४०२३९२ | ४०२४ | ५ महिने | नुतन सिनारे ९९२१९२४५४२ |
| १० | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/161 | विद्युत | पुष्पमंगल ते महेश सोसायटी चौक रस्त्यावरील डेकोरेटीव्ह पोलच्या दिव्यांच्या देखभाल दुरुस्ती करणे. | ४१५ | ६०१४३६ | ६०१४ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| ११ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/162 | विद्युत | बिबवेवाडी ओटा परीसर व विविध ठिकाणी विद्युतविषयक कामे करणे. | ४१५ | ७४५५५६ | ७४५६ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| १२ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/163 | विद्युत | अप्पर इंदिरानगर परिसरातील पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४५४४६ | ८४५४ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| १३ | PMC/DMC-5/ BIBWEWADI/2023/164 | विद्युत | डायस प्लॉट गुलटेकडी येथे विद्युत विषयक कामे करणे.(डी.पी.डी.सी) | ४१५ | ८४७४०४ | ८४७४ | ३ महिने | सागर कांबळे ९६८९९३११७४ |
| १४ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/283 | भवन | अंबिल ओढा कॉलनी, साने गुरुजी नगर येथील विरंगुळा केंद्राशेजारी असलेली भिंत धोकादायक झाल्याने तातडीने दुरुस्त करणे. | ४१५ | ८४७१२७ | ८४७१ | ५ महिने | श्रीमती स्वाती बांगर ८६००३८५९१४ |
| १५ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/284 | पथ | सदाशिव पेठ, नारायण पेठ, बुधवार पेठ भागांमध्ये वाहतूक विषयक व थर्माप्लास्टीक पेंट मारणे (फेरनिविदा) | ४१५ | ५८९९२८ | ५८९९ | ६ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| १६ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/285 | गवनी | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. १५ मध्ये शौचालय दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७२९६ | ८४७३ | ४ महिने | श्री. सुर्यकांत वाल्मिकी ९६८९९३५०९६ |
| १७ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/286 | विद्युत | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत मंगळवार पेठ येथे विद्युत विषयक तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४७४२० | ८४७४ | ३ महिने | श्री. सुर्यभान जाधव ९६८९९३११७३ |
| १८ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/287 | विद्युत | पुणे महानगरपालिकेच्या सणस हॉस्टेल येथील इमारतीमध्ये लिफ्ट विषयक कामे करणे. | ४१५ | ४४२४७९ | ४४२५ | २ महिने | श्री. सुर्यभान जाधव ९६८९९३११७३ |
| १९ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/288 | गवनी | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पर्वतीदर्शन व विविध ठिकाणी शौचालय दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४६६२५ | ८४६६ | ४ महिने | श्री. विनय येलपले ८६००८१८००७ |
| २० | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/289 | गवनी | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. २९ मध्ये गवनी भागात विविध ठिकाणी दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ७९६०६५ | ७९६१ | ४ महिने | श्री. विनय येलपले ८६००८१८००७ |
| २१ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/290 | गवनी | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. २९ मध्ये शौचालय दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४६७०९ | ८४६७ | ४ महिने | श्री. विनय येलपले ८६००८१८००७ |
| २२ | PMC/DMC-5/ VISHRAM/2023/291 | ड्रेनेज | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय स्वच्छता व दुरूस्ती ड्रेनेज लाईन चेंबर लाईन साफसफाई व गाळ काढणे, दुरूस्ती विषयक कामे करणे, भाग -३. (फेरनिविदा) | ४१५ | ६७७७७१ | ६७७८ | ६ महिने | श्री. निखिल साबळे ९६८९९३६९७५ |

१) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही भारतातील कोणत्याही शासकीय/निमशासकीय यंत्रणाकडील पूर्वनोंदणीचे वैध प्रमाणपत्र असलेल्या ठेकेदारांकडून (प्रत्येक कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती वर ठेकेदाराने स्वाक्षरी करून अ पाकिटात अपलोड करावयाचे आहे. २) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे नविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. ३) ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपूर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा. Contact No. ०१२०-४२००४६२/०१२०-४००१००२/९१-८८२६२४६५९३. ४) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील. ५) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि.)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहेत.

**स्वाक्षरी/-**
**उपआयुक्त**
**परिमंडळ विभाग क्र. ५**
**पुणे महानगरपालिका, पुणे**

---

**ICICI Home Finance**

**कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत
**शाखा कार्यालय :** ११८७/२२, वेंकटेश मेहेर, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५.

### (नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा)

### अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत, तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/ कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास | येणे असलेली रक्कम | राखीव किंमत | मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  | इसारा रक्कम ठेव |  |  |
| ए | बी | सी | डी | ई | एफ | जी |
| १ | सुधीर मेनीनाथ वाघमारे (कर्जदार), पुष्पा सुधीर वाघमारे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीडब्ल्यूके ००००१२८१६१८ | शॉप नं. १३, तळमजला, कुमार, पूर्णकुटी, सर्व्हे क्र. २५/४०३, नीता पार्क, गाव येरवडा, तालुका पुणे, महाराष्ट्र-४११ ००६ | रु. २२,४८,६७६/- दि. २२ नोव्हेंबर २०२३ | रु. २५,८१,८७५/- | ११ डिसेंबर २०२३ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० | १९ डिसेंबर २०२३ रोजी दु. २.०० ते दु. ३.०० |
|  |  |  |  | रु. २,५८,१९०/- |  |  |

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोबल टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** - https://BestauctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार/सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **१८ डिसेंबर २०२३** रोजी **संध्याकाळी ०५.००** पर्यंत अदा करावे त्यास्तव ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट (डीडी) यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, ११८७/२२, वेंकटेश मेहेर, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५** येथे **१८ डिसेंबर २०२३** रोजी **संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड,११८७/२२, वेंकटेश मेहेर, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५** येथे **१८ डिसेंबर २०२३** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डिमांड ड्राफ्ट (डीडी) हा राष्ट्रीयीकृत बँकेचा/शेड्युल बँकेचा आणि **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-लिलाव** यांच्या नावे आणि **पुणे** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी, तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-०२२-६९९७४३००** किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार **नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

**दिनांक : १ डिसेंबर २०२३**
**स्थळ : पुणे**

**प्राधिकृत अधिकारी**
**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

---

## कर्नाटका बँक लि.

Your Family bank Acrosss India.
सीआयएन : L85110KA1924PLC001128

## ई-लिलाव विक्रीची जाहीर सूचना

मुख्य कार्यालय, मंगळुरू-५७५ ००२
एआरएम शाखा : मुंबई, दुसरा मजला, 'ई'- ब्लॉक, दी मेट्रोपोलिटन, प्लॉट क्र. सी-२६ व सी-२७, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
लँडलाइन : ०२२-३५००८०१७/३५१२८४८२/३५०८२५५८
ई-मेल : mubaiarm@ktkbank.com

### दि. ०४.०१.२०२४ रोजी स्थावर मालमत्तांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) व ९ (१) च्या तरतुदींअंतर्गत स्थावर **मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना** तमाम जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण खालील निर्देशित स्थावर मालमत्ता ज्यांचा प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे ताबा (प्रत्यक्ष/प्रतीकात्मक ताबा यांचा तपशील खालील दिलेला आहे) घेण्यात आला आहे, त्या मालमत्तांची कर्नाटका बँक लि. च्या थकबाकीच्या त्यावरील पुढील व्याज व मूल्यासमवेत वसुलीकरिता **दि. ०४.०१.२०२४ रोजी ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'' व ''जी काही आहे तेथे आहे''** तत्त्वावर विक्री करण्यात येईल. तपशील खालीलप्रमाणे आहे : राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेवीचा तपशील खालीलप्रमाणे आहे व इसारा रक्कम ठेव **दि. ०३.०१.२०२४ रोजी दु. ४.०० वाजता** वा तत्पूर्वीपर्यंत खात्यामध्ये ऑनलाइन प्रदानाच्या माध्यमातून (ज्याचा तपशील खालील नमूद आहे) प्रदान करावी.

| अ. क्र. | शाखेचे नाव | कर्जदार/हमीदारांचे नाव व पत्ता | थकीत शिल्लक रु. | मालमत्तांचे विवरण | राखीव मूल्य (रु.) | लिलाव वेळ | इरठे सादरीकरणाकरिता खाते क्र./आयएफएससी कोड |
|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  | इसारा रक्कम ठेव (रु.) | बोली विस्तार मूल्य |  |
| १ | बावधन बुद्रुक पुणे | १. श्री. संतोष व्ही. बर्वेकर - श्री. विश्वनाथ बर्वेकर यांचे पुत्र, २. श्रीमती स्वाती संतोष बर्वेकर - श्री. संतोष व्ही. बर्वेकर यांच्या पत्नी **क्र. १ व २ यांचा पत्ता :** फ्लॅट क्र. ३०२, तिसरा मजला, बालाजी हाइट्स, बावधन बुद्रुक, पुणे-४११ ०२१ व ३. श्री. दीपक विठ्ठल शेगर - श्री. विठ्ठल शेगर यांचे पुत्र **राहणार :** फ्लॅट क्र. ०६, कानिफनाथ अपार्टमेंट, पीएमसी स्कूलजवळ, बावधन बुद्रुक, पुणे-४११ ०२१. | रक्कम रु. २२,६९,९३६.९२ (रु. बावीस लाख एकोणसत्तर हजार नऊशे छत्तीस व ब्याण्णव पैसे) अर्थात दि. १४.११.२०२३ रोजीनुसार पीएसटीएल खाते क्र. ९३३७००१८०००००१००१ अंतर्गत रु. १७,६१,८३३.६१ अधिक दि. १४.११.२०२३ पासून पुढील व्याज व मूल्य, दि. ०७.११.२०२३ रोजीनुसार टीएल खाते क्र. ९३३७००१६००००२४०१ अंतर्गत रु. २,०७,८७५.१९ अधिक दि. ०७.११.२०२३ पासून पुढील व्याज व मूल्य, दि. ३१.१०.२०२३ रोजीनुसार ओडी खाते क्र. ९३३७०००१०००००४०१ व अंतर्गत रु. ३,००,२२८.१२ अधिक दि. ०१.११.२०२३ पासून पुढील व्याज व मूल्य. | पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : निवासी फ्लॅट क्र. ३०२, तिसरा मजला, मोजमापित क्षेत्र साधारण ३९० चौ. फूट अर्थात ३६.२५ चौ. मी. बिल्टअप संलग्न टेरेस, 'बालाजी हाइट्स' नावाने ज्ञात इमारतीतील, क्र. २२७/१, ७४१ व ६०४ धारक जमिनीवर निर्मित, गाव बावधन बुद्रुक, तालुका मुळशी, जिल्हा पुणे, जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती मुळशी, जिल्हा पुणे व नोंदणीकरण जिल्हा निबंधक पुणे, उपनिबंधक हवेली, पुणे अंतर्गत. | रु. २३.४० लाख | ०४.०१.२०२४ रोजी स. १०.०० ते स. १०.१५ | आरटीजीएस खाते क्रमांक : ९३३३५००२००००४१०१ खात्याचे नाव : कर्नाटका बँक, आयएफएससी कोड : केएआरबी०००००९३३. |
|  |  |  |  |  | रु. २.३४ लाख | रु. १०,०००/- |  |
|  |  |  |  | ताबा दिनांक/ताबा प्रकार : प्रत्यक्ष ताबा दि. १२.१०.२०२३ रोजी घेण्यात आला आहे. |  |  |  |

**(कायद्याच्या अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद ८ च्या तरतुदींअंतर्गत कर्जदार/गहाणवटदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की, त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.)**

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तीकरिता कर्नाटका बँकेची वेबसाइट अर्थात www.karnatakabank.com मधील लिंकवर Mortgaged Assets for Sale शीर्षांतर्गत संपर्क साधा. ई-लिलाव पोर्टल https://bankauctions.in च्या माध्यमातून दि. ०४.०१.२०२४ रोजी वरील निर्देशित वेळांवर ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह आयोजित तकरण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी कृपया त्यांची नावे https://bankauctions.in येथे नोंदवावीत व **मे. ४ क्लोजर, ६०५ए, ६ वा मजला, मैत्रीवनम, अमीरपेट, हैदराबाद-५०० ०३८, संपर्क क्र. ०४०-२३७३६४०५, मोबाइल ८१४२०००००६२,** ई-मेल : arijit@bankauctions.in येथून नि:शुल्क युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा व **ई-लिलावावर (अस्थायी स्वरूपात ०३.०१.२०२४) ऑनलाइन प्रशिक्षण प्राप्त करावे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २१.११.२०२३**

सही/- मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी
कर्नाटका बँक लि.